जा.क्र.का.15/वामुदत 2018-19/ 353
मुख्य नियंत्रक महसूल प्राधिकारी तथा
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1
दि.31/03/2018

**आदेश**

विषय :- सन 2018-19 या आर्थिक वर्षाकरीता वार्षिक मूल्य दर तक्त्याबाबत..

संदर्भ :- शासनाचे गोपनीय पत्र क्र.मुद्रांक-2017/प्र.क्र.236/म-1, दि.31/3/2018.

ज्याअर्थी, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम 1995 च्या नियम क्र.4 (3) अन्वये प्रतीवर्षी एप्रिल महिन्याच्या 1 तारखेस महाराष्ट्र राज्यातील सर्व भौगोलिक क्षेत्रासाठी स्थावर मालमत्तेचे वार्षिक मूल्य दर तक्ते प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र मुद्रांक (मालमत्तेचे वास्तव बाजारमूल्य निश्चित करणे) नियम 1995 च्या नियम 4 च्या उप-नियम क्र. (4) व उप-नियम क्र.(9) मधील तरतूदी अन्वये शासनाने खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

"सद्यस्थितीत बांधकाम व्यवसायामध्ये असलेली मंदी लक्षात घेता, सन 2018-19 या आर्थिक वर्षाकरीता वार्षिक मूल्य दर तक्ते तयार करताना दरामध्ये कोणतीही वाढ न करता, सन 2017-18 चेच वार्षिक मूल्य दर संपूर्ण राज्यासाठी कायम ठेवावेत".

त्याअर्थी, शासनाचे निदेश विचारात घेऊन सन 2018-19 या आर्थिक वर्षाकरीता, सन 2017-18 चे वार्षिक दर तक्ते, मूल्यांकन मार्गदर्शक सूचना (वेळोवेळी परिपत्रकाव्दारे केलेल्या बदलासह) व नविन बांधकाम दर संपूर्ण राज्यासाठी कायम ठेवणेत येत आहेत.

सदरचे वार्षिक दर तक्ते नोंदणी विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर online services या सदराखाली eASR या ठिकाणी Process येथे उपलब्ध राहतील.

( अनिल कवडे )
मुख्य नियंत्रक महसूली प्राधिकारी तथा
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी सादर:-

1) मा.सचिव (महसूल,नोंदणी व मुद्रांक विभाग), महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई-32.
2) मा.महालेखापाल,(लेखापरिक्षा)-II, नागपूर.

G:\technical\ASR 2018-19 -सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना

Scanned by CamScanner